# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द),ता. आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. ०२१३३-२३०५८२ ई मेल - gcoeara@gmail.com

फॅक्स क्र. ०२१३३-२३०५८३ वेबसाईट : www.gcoeara.ac.in


### मुलांच्या वसतीगृहातील खानावळ व संस्थेसाठी उपहारगृह चालविण्यासाठी निविदा अर्ज

अ ) अर्जदाराबाबतची व्यवसायासंबंधी माहिती

अर्जदाराचे संपूर्ण नाव - ..........................................................

१) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता- ..........................................................

.................................. पिन कोड ...............

२) शैक्षणिक पात्रता- ..........................................................

३) अ- खानावळ चालविण्याचा अनुभव आहे काय ? होय / नाही

ब- असल्यास कोणत्या संस्थेच्या खानावळीचा ..........................................

अनुभव आहे त्याचे नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक ..........................................

क- खानावळ चालवण्याच्या अनुभवाचे प्रमाणपत्र ( कालावधी व खानावळीच्या क्षमतेचा उल्लेख असावा) सादर केले आहे काय ? होय / नाही

ड- ग्रामीण आरोग्य विभागाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

इ - अन्न व औषध प्रशासनाचा परवाना जोडला आहे काय ? होय / नाही

४) अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारची तक्रार / खटला पोलीस ठाण्यात प्रलंबीत आहे का ? आहे / नाही
असल्यास तपशील दयावा.

( या व्यतिरीक्त अनुभवासंदर्भात माहिती द्यावयाची असल्यास वेगळया पानावर नमुद करावी)

## ब ) निविदा अर्ज

१ ) मुलांच्या दरमहा जेवणाचा दर ( सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे ) रु. . . . . . . . . . . . . . . . .
दोन्ही वेळेला पोटभर जेवण देणे अनिवार्य आहे.

२) अ) एका महिन्याचे किमान ५ पेक्षा जास्त खाडे . . . . . . . . . . . . . . . .
मान्य असल्यास ती संख्या

ब) एकवेळच्या खाडयाचा दर रु. . . . . . . . . . . . . . . .

३) एका वेळेचा गेस्ट चार्ज (पाहुणे असल्यास) रु. . . . . . . . . . . . . . . .
(पाहुणे म्हणजे संस्थेच्या वसतीगृहात प्रशिक्षणासाठी आलेले
व तात्पुरत्या निवासासाठी असलेले विद्यार्थी, वसतीगृहात शासकीय
कामाने वास्तव्यात असलेले अधिकारी / कर्मचारी अथवा संस्थेचे
अधिकारी / कर्मचारी )

४) उपहारगृहासाठी मेनू व दर
येथे वेगवेगळया पदार्थाचा दर नमूद करावा.

मी खालील सही करणार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, वरीलप्रमाणे निविदा अर्जात माझ्याबद्दल दिलेली माहिती खरी आहे. जर माहिती खोटी आढळल्यास करार रद्द करण्यात यावा. तसेच मी दिलेले दर मंजूर झाल्यास संस्थाप्रमुखांच्या पूर्वपरवानगी शिवाय हया दरामध्ये कोणताही बदल करणार नाही. हया निविदा अर्जाच्या सोबतच्या अटी व शर्ती मला प्राप्त झाल्या असून त्याचे मला आकलन झालेले आहे.

मला संस्थेच्या मुलांच्या वसतीगृहासाठी असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असून त्याचे अधिन राहून मी वरील दरपत्रक सादर करीत आहे.

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव - )

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांकासह) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)
## मुलांच्या वसतीगृहातील खानावळ व संस्थेसाठी उपहारगृह : अटी व शर्ती

१. मुलांच्या वसतीगृहातील खानावळीमध्ये संस्थेसाठीचे उपहारगृह देखील चालवावे लागेल. सर्वसाधारणपणे जेवण देण्याची वेळ दुपारी १२.०० ते दुपारी २.०० व सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० अशी राहील. उपहारगृहाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी १२.०० व दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० अशी राहील. ही अट मान्य असणा-या कंत्राटदारांनीच निविदा भरावी. फक्त जेवणासाठी खानावळ चालविण्याचे कंत्राट दिले जाणार नाही. उपहारगृह व खानावळ दोन्ही एकाच कंत्राटदारांस चालवावे लागेल.

२. वसतीगृहातील दोन्ही वेळेला जेवण घेण्या-या मुलांची अंदाजे संख्या ३५० ते ३७५ असेल. उपहारगृहामध्ये संस्थेतील एकूण २००० विद्यार्थी / अधिकारी / कर्मचारी यापैकी कोणीही येऊ शकेल.

३. खानावळ चालकांकडे ग्रामीण आरोग्य विभागाचा दाखला, अन्न व औषध प्रशासनाचा दाखला इ. कागदपत्रे अनिवार्य आहेत. त्याची प्रत निविदेसोबत जोडावी.

४. स्वयंपाकासाठीचे स्वयंपाकघर,पाणी कनेक्शन, गॅस कनेक्शनसाठीचे पाईपिंग, स्वयंपाकाची व जेवणासाठी आवश्यक भांडी संस्था पुरवेल. त्याचे भाडे रु. ६०००/- दरमहा करार सुरु झाल्यापासून करार संपेपर्यंत (सुटीचे दिवस धरुन ) खानावळ चालकांनी भरणे आवश्यक आहे.

५. उपहारगृहासाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ तसेच भांडी यांची सोय कंत्राटदारांनी स्वत: करावयाची आहे.

६. उपहारगृहामध्ये दूध, चहा, कॉफी, शीतपेये तसेच हलके अल्पोपहाराचे पदार्थ (पोहे, शिरा, खिचडी, इडली सांबार, डोसे, सँडवीच, नूडल्स, पॅटीस इत्यादी ) उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

७. केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार उपहारगृहामध्ये Junk Food (Potato chips / wafers/Kurkure इत्यादी) तसेच तंबाखूजन्य पदार्थ यांची विक्री करण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हे पदार्थ विक्रीसाठी ठेवता येणार नाहीत.

८. खानावळ व उपहारगृहामध्ये उपलब्ध असणा-या सर्व अन्नपदार्थांचा दर्जा उत्कृष्ठ असावा. सर्व अन्नपदार्थ ताजे, गरम व स्वच्छ असावेत.

९. खानावळीतील कर्मचारी यांच्या स्वच्छतेचे कटाक्षाने पालन होणे अनिवार्य आहे.

१०. तेल, गहू, तांदूळ, डाळी, कडधान्य, भाज्या इ. जेवणाचे घटक पदार्थ चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक राहील.

११. दररोजच्या जेवणामध्ये सोबतच्या मेनूकार्डप्रमाणे मेनू देणें आवश्यक आहे. मेनूमध्ये काही कारणाने बदल अपरिहार्य असल्यास होस्टेल रेक्टरना त्याची पूर्वसूचना द्यावी लागेल.

१२. दरमहा ५ जेवणाचे खाडे ( गैरहजेरी) गृहीत धरण्यात येतील.

१३. कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ.ची विल्हेवाट स्वत:ची स्वत: करणे आवश्यक राहील. तसेच कच-याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१४. संस्थेच्या अधिकृत विद्यार्थ्यांशिवाय बाहेरील व्यक्तींना खानावळीत प्रवेश देवू नये अथवा त्यांना डबा देण्याची सुध्दा परवानगी नाही. (विद्यार्थ्यांचे पालक किंवा नातेवाईक असल्यास रेक्टर यांच्या परवानगीने गेस्ट चार्ज आकारुन देणे)

१५. रु. २,५०,०००/- ( रु. दोन लाख पन्नास हजार फक्त ) अनामत रक्कम संस्थेत जमा करुनच करार अस्तित्वात येईल.

१६. कराराची मुदत एक वर्ष असेल. तथापी खानावळीच्या व उपहारगृहाच्या त्या वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करुन पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना आहेत. कराराची मुदत संपल्यानंतर सर्व साहित्य संस्थेकडे जमा करण्यात यावे. त्यानंतरच कंत्राटदारांची अनामत रक्कम परत केली जाईल.

१७. कंत्राटदारांनी करार व अटीचे मान्यतेचे करारपत्र रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करावे लागेल. खानावळीचे व उपहारगृहाचे कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करुन सदर करार

तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१८. मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांचे सुचनेनुसार खानावळीची व उपहारगृहाची आकस्मिक तपासणी वेळोवेळी करण्यांत येईल. कंत्राटदाराने तपासणीच्यावेळी सहकार्य करावे.

१९. खानावळीमध्ये व उपहारगृहामध्ये मद्यपान / धुम्रपान / अंमली पदार्थांचे सेवन व विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

२०. खानावळीतील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. खानावळीतील अन्नापासून विद्यार्थ्यांना अथवा इतरांना कोणत्याही प्रकारची बाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी खानावळ चालकावर राहील.

२१. कोणतेही कारण न देता सदर निविदा प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार संस्थेकडे राखीव आहेत.

२२. पॅनकार्डची झेरॉक्स प्रत निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२३. खानावळीमध्ये कोणत्याही कर्मचा-यास राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२४. खानावळीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या आरोग्याचा वैद्यकीय दाखला घेऊन त्यांची संपूर्ण माहिती संस्थेस द्यावी लागेल.

२५. सेवा कर (Service Tax) नोंदणीचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

२६. खानावळीच्या जागेचा वापर दुस-या कोणत्याही व्यवसायासाठी करता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

२७. विद्यार्थांच्या परीक्षेच्या पूर्वतयारी कालावधीदरम्यान व परीक्षेच्या कालावधीमधे खानावळीच्या मासिक दराची आकारणी प्राचार्यांच्या सूचनेनुसार करावी लागेल.

२८. विद्यार्थ्यांकडून जेवणाच्या मासिक दराच्या वसूलीची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील. उपहारगृहामध्ये विक्री केलेल्या पदार्थांची किंमत विक्रीच्या वेळेसच घेण्याची दक्षता कंत्राटदारांनी घ्यायची आहे.

२९. उपहारगृह व खानावळीची वेळ प्राचार्य, रेक्टर व विद्यार्थ्यांच्या चर्चेनुसार बदलता येईल.

३०. निविदा सादर करताना रु.२०००/- ( परत न मिळणारी निविदा फॉर्म फी ) संस्थेत रोखीने जमा करुन त्याची शासकीय पावती निविदेसोबत जोडावी. शासकीय पावती जोडलेली नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

( प्रा. श्री.वि. जोशी )
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (अवसरी खुर्द)

* मुलांची खानावळ – 2016-17 सत्रासाठी जून/ऑगस्ट पासून 'प्रत्येक' सुरु साठी करू *

| *वार* | *सकाळ* *पातळ भाजी* | *सुकी भाजी* | *सायंकाळ* *पातळ भाजी* | *सुकी भाजी* |
|---|---|---|---|---|
| सोमवार | मसाला वांगी | गवार | मोड आलेली मटकी | कांद्याचा झुणका/बेसन |
| मंगळवार | मटर | ढोबळी मिरचीचे सुके बेसन | बटाटा + वांगी | पत्ता कोबी |
| बुधवार | दोडका | चवळी शेंगा | मटर | कांद्याचा झुणका/बेसन |
| गुरुवार | सगळा बटाटा रस्सा / डाळभाजी | मोड आलेला मूग | डाळ भाजी / बटाटा रस्सा | टोमॅटो + फ्लॉवर भाजी<br>*Sweet* गुलाबजामून, जिलेबी, लाडू, शीरा* |
| शुक्रवार | मटर | टोमॅटो + फ्लॉवर | छोले | चवळी शेंगा |
| शनिवार | मसाला वांगी | मसाला भेंडी | दोडका | ढोबळी मिरची झुणका |
| रविवार | कढी | टोमॅटो + फ्लॉवर | मटर | दाल तडका |

महत्त्वाचे :- (i) दोन्ही वेळा पापड + दही + सुकी चटणी + लोणचे *
(ii) दोन्ही वेळा ग्रीन सॅलड (कांदा + काकडी + मुळा + गाजर + बीट + लिंबू + टोमॅटो)
(iii) रात्री वेळा साधा भात + yellow तुरीच्या डाळीचे वरण *
+ मसाला

[illegible signature]